मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./आरोग्य/3८६/२०२२-२३
दिनांक : २३/०८/२०२२.

## द्वितीय फेर जाहिर दरपत्रक

**इसारा रक्कम रु.९७८०/-**

कचराकुंडी (Dust Bin) विक्री करणारे विक्रेते, पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांना कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचरा कुंडी (Dust Bin) खरेदी करायचे असून त्याकरिता दिनांक २४/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक २६/०८/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद पाकीटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | आवश्यक कचरा कुंडी (Dust Bin) तपशिल | आवश्यक नग | प्रति नग दर (GST सह) |
|---|---|---|---|
| १ | हिरवा | १५० नग | |
| २ | निळा | १५० नग | |
| | एकुण | ३०० नग | |

**अटी-शर्ती**

१. पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधनकारक राहिल.
२. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
४. दरपत्रकदारांनी जाहिर निविदा सुचनामध्ये नमुद केलेली इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट स्वरुपात दरपत्रक सादर करतेवेळी जमा करावयाचा आहे अन्यथा आपले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
५. दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
६. दरपत्रकात नमुद वस्तुंचे/साहित्यांचे दर हे सादर करताना वाहतुक खर्च तसेच सर्व करांसहित सादर करण्यांत यावे.
७. पुरवठा करण्यात येणाऱ्या २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचराकुंडी हि BSEN-८४०-१ स्टॅन्डर्ट प्रमाणित असावे व त्या संबंधित सर्व आवश्यक चाचणी अहवाल तसेच प्रमाणपत्रक सोबत जोडण्यात यावे.
८. पुरवठादाराने २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचराकुंडी या व्हिल, लिड तसेच टॉईंग प्रोविजन सोबत पुरवठा करणे बंधनकारक आहे.
९. कार्यादेश दिल्यानंतर ७ दिवसांचे आत काम करणे बंधनकारक राहील अन्यथा प्रति दिन १०० रु.दंड आकारण्यात येईल.
१०. आपण पुरविलेल्या कचराकुंडी ६ महिन्याच्या आत पुन्हा खराब झाल्यास आपणांस सदर कचराकुंडी विनामोबादला बदलून द्यावे लागेल.
११. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांना राहिल.
१२. वरिल अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
१३. दिलेल्या दरपत्रकामधील प्राप्त दरा व्यतिरिक्त इतर कोणत्याही अतिरिक्त देयकाची मागणी पुरवठादारास करता येणार नाही.
१४. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २६/०८/२०२२ रोजी संध्या. ५.०० वाजता मा. उप-आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार
दिनांक :- / /२०२२.

उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

२३/८/२०२२
निरज गाढवे
व.आ.नि.

२३/८/२०२२
मनाली शिंदे
प्र. सहा. आयुक्त (घन.व्य.)

Scanned with Oken Scanner